# बालशिक्षणाची सामाजिक अंगे

बंधुभगिनींनो,

बालशिक्षणाविषयी काही नवीन विचार आपल्यापुढे ढेवावेत या हेतूने हे भाषण करण्यासाठी मी आपल्यापुढे उभा आहे.

साधारणपणे तीन ते सहा वर्षे असे बालशिक्षणाचे वय मानले जाते. परंतु अलीकडे पालकांच्या रेटयामुळे आणि शाळांनी स्वीकारलेल्या पालक-अनुनयामुळे ही वयोमर्यादा व्यवहारात खाली आणून वयवर्षे २ ते ३ खेळवाडी, ३ ते ४ शिशुवाडी आणि ४ ते ५ बालवाडी, अशी. त्रैवार्षिक योजना आखून प्राथमिक शिक्षण औपचारिकरित्या सुरू करण्याचे वय पाचव्या वयापर्यंत खाली ओढले गेले आहे. वयाबाबत काही निश्चित संकल्पना, काही निश्चित धोरण आजमितीस तरी, या देशात, अस्तित्वात नाही.

बालशिक्षणाचे वय कोणते असावे, याविषयी समाजात विस्कळितपणा असणे हे शिक्षणरचनेत विषमता निर्माण करणारे आणि शिकू पाहणा-या मुलांवर अन्याय करणारे आहे. त्यामुळे, याविषयी नेमकेपणाने विचार करून निश्चित निर्णय घेण्याची गरज आहे. विशेषत: आपण ज्या काळात हा विचार करीत आहोत, तो काळ, मुलांविषयी, यापूर्वी कधीही नव्हती एवढी नि अशी माहिती घेऊन आलेला आहे. साहजिकच, इथून पुढे मुलांविषयी जो काही विचार आपण करणार असू तो या माहितीचा आधार घेऊन करणे, आपल्याला क्रमप्राप्त आहे. दुसरे असे की, आजवर अशा प्रकारची माहितीच जेव्हा आपल्याला उपलब्ध नव्हती, तेव्हा आपण, प्रौढांच्या आचार-विचारांच्या अंगाने मुलांना केव्हा नि काय शिकवावे याचा 'शिक्षण ढाचा' तयार करून मुलांना शिकवीत होतो. परंतु आता जेव्हा, मुलांच्या विविध क्षमता, कोणत्या वयांत कसकशा विकसित होतात याची, तसेच नैसर्गिकरित्या मुले शिकतात कशी याची ब-यापैकी माहिती उपलब्ध झाल्यानंतर, आपल्याला मुलांच्या शिक्षणाविषयीचा आपला दृष्टिकोण आमूलाग्र बदलणे आवश्यक आहे. हा बदल करणे म्हणजे मुलांना शिकविण्याच्या विचाराकडून मुलांच्या आपणहून 'शिकण्याच्या विचाराकडे जाणे होय. या मूलभूत बदलालाच, “आपल्या विचारांना बालकेंद्री दृष्टिकोणाचे अधिष्ठान देणे', असे म्हणता येईल.

बालमानसशास्त्रज्ञ, शरीरविज्ञान, मज्जामानसशास्त्रज्ञ आणि भाषाविज्ञान या विविध शास्त्रांमधील अलीकडच्या संशोधनांनी, आपली मुलांविषयीची जाण खूपच वाढविली आहे. उदाहरणार्थ, आता आपल्याला नव्याने मिळालेली माहिती अशी आहे:

१. नुकत्याच जन्मलेल्या मुला-मुलींच्या मेंदूमधील पेशींची संख्या ही प्रौढांच्या मेंदूमधील पेशींच्या संख्येपेक्षा कितीतरी अधिक म्हणजे जवळजवळ दुप्पट असते. याचा अर्थ असा की मुलांच्या शिकण्याच्या क्षमता प्रौढांच्या क्षमतांपेक्षा कितीतरी अधिक असतात. म्हणजेच, मुलांची पाटी कोरी नसते, मूल मातीच्या गोळा नसते तर काहीही शिकण्याच्या शक्यतांनी मुलांच्या मेंदूची टोपली गच्च भरलेली असते.

२. अशा अक्षरश: अब्जावधी पेशी मेंदूमध्ये घेऊन मूल जन्माला आलेले असले तरी, मेंदू योग्य त-हेने कार्यरत होण्यासाठी मेंदूमधील या पेशींची परस्पर जोडणी होऊन त्यांचे एक सुंदर जाळे विणले जाण्याची गरज असते. हे काम, अर्थातच, जन्मापूर्वी झालेले नसते. जन्मानंतरच, बाहय जगाशी होत जाणा-या विविधांगी किया-प्रतिक्रियांतून हे जाळे विणले जात असते. असे जाळे विणले जाण्याची प्रकिया ही प्रामुख्याने वयाच्या आठव्या वर्षापर्यत, वेगाने चालू असते. त्यामुळे या कालावधीचे वर्णन, थोडक्यात, 'मेंदू घडणीचे वय' असे आपण करू शकू. शिक्षणाच्या व्यावहारिक अंगाने पाहावयाचे झाल्यास, मुलांचे आठ वर्षापर्यतचे वय हे पेशींच्या प्राथमिक जुळणीचे म्हणून मेंदूघडणीचे आणि म्हणूनच, शालेयपूर्व शिक्षणाचे-बालशिक्षणाचे वय म्हणून आपण घोषित करू शकू.

३. मेंदूच्या वरच्या भागातील विशिष्ट ठिकाणच्या पेशींची परस्पर जुळणी होऊन बालकांचे शरीर टप्प्याटप्प्याने कार्यरत होत जाते. पालथे पडणे, बसणे, रांगणे, उभे राहणे, चालणे, धावणे या सर्व शारीरिक किया, सर्वच मुलांच्या बाबतीत एकाच कमाने घडत जातात हा आपला कौटुबिक अनुभव असतोच. हे कार्य असेच वेगाने, साधारणपणे आठव्या वयापर्यंत चालत जाते; आणि मग या वयाला, शारीरिकदृष्टया सर्व प्राथमिक गोष्टींचे नियंत्रण मुलांना प्राप्त होत असते; शरीर त्यांच्या ताब्यात येत असते.

४. वयाच्या आठव्या वर्षापर्यत, दैनंदिन व्यवहारांत वापरण्याजोगी अशी पुरेशी पहिली भाषा आत्मसात झालेली असते. ऐकून व बोलून, एक किंवा अनेक भाषा शिकण्याचे प्रभावी वय-वेगाने भाषा आत्मसात करण्याचे वय, आता हळूहळू संपुष्टात येत असते. इथून पुढे भाषा आत्मसात करण्याचा वेग कमी होतो. त्यामुळे भाषा आत्मसात करण्याचे सर्वात संवेदनशील वय म्हणून या वयाची ओळख आपण करून घेऊ शकतो. भाषेकरवी जीवनातील सर्व व्यवहार करण्याची ताकद या वयापर्यत प्राप्त झालेली असते.

५. लहान मुलांना बोलता येण्यापूर्वी इतरांनी बोललेले काहीसे कळायला लागते. अशी भाषा कळायला लागते तेव्हाच मुलांची विचार करण्याची प्रकियाही सुरू होते. पुढे भाषेचे आकलन वाढत जाऊन, भाषा बोलताही येऊ लागते. यातून भाषेकरवी विचार करण्याची प्रकिया वाढीस लागते. वयाच्या आठव्या वर्षापर्यंत विचार करण्यासाठी आणि विचार मांडण्यासाठी भाषेचा उपयोग करणे सहजपणे जमू लागलेले असते. अर्थात्, या दोन्ही स्तरांवरील विचार प्रक्रियांमध्ये असलेली मुलांची तार्किकता ही खास त्यांची तार्किकता असते. ती अनेकदा प्रौढांपेक्षा गुणात्मकदृष्टया वेगळी असते.

६. मुलांच्या भावनिक व बौध्दिक विकासासाठी आवश्यक असणारा समाजसंपर्क, आठव्या वर्षापर्यंत चांगलाच वाढलेला असतो. घराच्या मर्यादित विश्वातून बाहेर पडून मुले, परिसरातील अनोळखी विश्वाशी ओळख करून घेतात; त्या विश्वात रमण्याची वृत्तीही तोवर निर्माण होते. एवढेच नव्हे तर, मुले या बाहय जगाशी, मित्रत्वाचे आणि भावनिक संबंधही जुळवायला लागतात. स्वत: पुढाकार घेऊन संपर्कही करता येऊ लागतो. ७. साधारणपणे वयाच्या पहिल्या दोन वर्षातच मुलांचे 'स्व'त्व जागे होते. त्यांना स्वत:ची ओळख होते; आणि आपण इतरांपेक्षा एक वेगळी व्यक्ती आहोत, याचेही भान येऊ लागते. वयाच्या आठव्या वर्षापर्यंत ही ओळख, एकीकडे, पक्की होत जाते, तर दुसरीकडे, त्यांचे स्वत:चे असे स्वतंत्र विश्वही मुले, भावनिक नि बौध्दिक पातळीवर निर्माण करतात. त्यांच्या स्वतःच्या वागण्याच्या रीतीही ठरू लागतात आणि दुस-यांनी आपल्याशी कसे वागावे याच्या त्यांच्या अपेक्षाही निर्माण होतात.

___या सर्व बाबी विचारात घेतल्या तर, एकविसाव्या शतकातील आपल्या डोळयासमोर असलेले बालक हे विसाव्या शतकातील बालकापेक्षा काहीशी वेगळी प्रतिमा घेऊन आपल्यापुढे उभे राहते. बालकाचा अंगभूत विकास हाच जर बालशिक्षणाचा हेतू मानला तर बालकाच्या नैसर्गिक विकासाला अनुसरून बालशिक्षण व्हावे, हे ओघानेच येते. प्रत्येक बालकाचा जन्म आणि त्याची वाढ वेगळया पार्श्वभूमीवर होत असेल तर, व्यक्तीगत स्तरावरील बालशिक्षणाचा ढाचा ठरवावा लागेल आणि बालकाचा विकास हा प्रामुख्याने विशिष्ट संस्कृतीच्या कोंदणातच होणार असेल तर संस्कृतीशी संधान ठेवून बालशिक्षणाचा व्यवहार आखावा लागेल.

बालकाचे आठ वर्षापर्यंतचे वय हे बालशिक्षणाचे वय मानले तर, प्रचलित शिक्षणव्यवहारांच्या दृष्टीने त्याचे स्थूलमानाने तीन भाग होतात.

०-३ वर्षे हे घरातील वाढ-विकासाचे वय

३-६ वर्षे हे बालशाळेत जाऊन शैक्षणिक अनुभव घेण्याचे वय, आणि

६-८ वर्षे हे प्राथमिक शिक्षणातील पहिली व दुसरीचे औपचारिक शिक्षणाचे सुरूवातीचे वय.

आजवर आपण वयाच्या सहाव्या वयापासून औपचारिक प्राथमिक शिक्षणाचे वय मानून मुलांच्या शालेय जीवनाची सुरूवात तेव्हापासून करीत आहोत. शिक्षणाचा मूलभूत हक्क मांडणारा भारतीय राज्यघटनेतील उल्लेखही 'सहा ते चौदा वयांतील मुलांना प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्क' देणारा आहे. मात्र बालकांच्या नैसर्गिक विकासाच्या अंगाने विचार करायचा झाल्यास, या शिक्षण स्तराची पुनर्माडणीच करावी लागेल. या पुनर्माडणीत वयोमानानुसार ‘इयत्ता' तर ठरवाव्या लागतीलच, पण त्याचबरोबर त्या प्रत्येक इयत्तेतील शिक्षणाचे - म्हणजे शिक्षणाचा आशय आणि शिक्षणाच्या पध्दती यांचे स्वरूपही नेमकेपणाने ठरवावे लागेल.

उदाहरणार्थ, इयत्ता

| **वय** | **इयत्ता** | **शिक्षणाचे स्वरूप** |
|---|---|---|
| ०-३ | -- | घरातील संरक्षण, पोषण व सहजशिक्षण खेळवाडी |
| ३-४ | खेळवाडी | इतरांच्यात रमविणारे, खेळांतून शिक्षण शिशुवाडी |
| ४-५ | शिशुवाडी | अनौपचारिक कृतियुक्त व्यामिश्र अनुभवांचे शिक्षण बालवाडी |
| ५-६ | बालवाडी | अनौपचारिक कृतियुक्त व्यामिश्र अनुभवांचे शिक्षण प्राथमिक पहिली |
| ६-७ | प्राथमिक पहिली | अनौपचारिक लेखन-वाचन-गणनाचे कृतियुक्त शिक्षण ७-८ प्राथमिक |
| ७-८ | प्राथमिक दुसरी | औपचारीक लेखन-वाचन-गणनाचे मूर्त-अमूर्त कौशल्यांचे सुरूवातीचे शिक्षण |

आठव्या वयाच्या म्हणजे या प्रतिमानातील प्राथमिक दुसरीच्या अखेरीस, भाषानुभव (वाचन, लेखन, संभाषण) आणि गणितानुभव (संख्यासंबोध) यांच्या पूर्वतयारीने पुढील औपचारीक-अमूर्त शिक्षणासाठी ‘उड्डाण स्थिती' यावी अशी अपेक्षा ठेवता येईल. खरे तर, आठ वर्षापर्यंतचे बालशिक्षणाचे फक्त दोनच भाग कल्पिता येतील. पहिला, कोणत्याही संस्थात्मक शिक्षणाच्या पूर्वीचा किंवा घरच्या शिक्षणाचा वयाच्या पहिल्या तीन वर्षाचा कालखंड; आणि त्यानंतरचा म्हणजे तीन ते आठ वयोगटाचा पाच वर्षाचा कालखंड. यानंतरच औपचारिक प्राथमिक शिक्षणाचा कालखंड सुरू करावा.

**घरचे बालशिक्षण**

या पहिल्या तीन वर्षाचे, बालकाच्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. बालकाच्या सर्वांगीण वाढीचे नि विकासाचे हे सर्वोत्तम वय आहे; आणि म्हणूनच आयुष्याचे पायाभूत असे वय आहे. या तीन वर्षातील विकासाचे टप्पे, निकष, अपेक्षित अंदाज, अडचणींच्या शक्यता आणि सामाजिक गरजा या सा-यांविषयी भरपूर माहिती उपलब्ध आहे. ही माहिती या वयांतील लहान मुलांच्या पालकांपर्यत नेमकेपणाने पोचून, ती त्यांच्या समजुतीत, जाणीवेत आणि वागणुकीत उतरण्यासाठी 'पालक प्रबोधन व प्रशिक्षण' चळवळ जोमाने पुढे नेण्याची गरज आहे. असे केल्याने एकीकडे आपण जबाबदार पालकत्व निर्माण करू तर दुसरीकडे, पुढच्या पिढीतील बालकांचे भवितव्य उज्ज्वल करण्याचे देशकार्य प्रभावीपणे करू शकू.

**बालशिक्षणाचे पंचवार्षिक नियोजन**

वयवर्षे तीन ते आठ असा पाच वर्षाचा, शालेयपूर्व शिक्षणाचा परंतु तरीही संस्थात्मक शिक्षणाचा व त्याला जोड देऊन घरच्या बालशिक्षणाचा नियोजनबध्द आराखडा तयार करणे शक्य आहे. तसा तो करणेही आवश्यक आहे. हे वय हा बालकांच्या आयुष्यातील आणि त्यांच्या विकासामधील अत्यंत संवेदनशील असा कालावधी आहे. या कालावधीची पुढील वैशिष्टये लक्षात घेण्यासारखी आहेत;

अ/ शारीरिकदृष्टया स्वावलंबी कृतींच्या प्रस्थापनेचा हा काल आहे.

आ/ भाषासमृध्दीसाठी ‘संधींचे गवाक्ष' पुरविणारा वेगवान भाषाविकासाचा हा काळ आहे.

इ/ व्यक्तिगत अशा उपजत बुध्दिमत्तांच्या बिजात्मक पटनिर्मितीचा हा काल आहे.

ई/ घराच्या मर्यादित चौकटीतून बाहेर पडून विशाल सामाजिक संपर्कात शिरण्याचा हा काल आहे. अमूर्त विचार करणे आणि अमूर्त कल्पना करणे यांची सुरूवात होण्याचा हा काल आहे.

ए/ वरील सर्व विकास पैलूंना आधारभूत अशा मेंदूमधील पेशी-जालिका निर्माण

होण्याचाच हा काल आहे.

एकूणच मानवी जीवनाला आधारभूत ठरणा-या अशा या सर्व नैसर्गिक घटनांना प्रेरित करणारे, प्रभावीत करणा-या बाहय अनुभवांचे विश्व कसे असावे-कसे नसावे, त्यासाठी संबंधित प्रौढांनी काय करावे-काय करू नये, एकूण बालपोषक आणि बालशोषक व्यवस्था म्हणजे काय इत्यादी अनेक बाबींचे ज्ञान समाजात सर्वदूर पसरण्याची गरज आहे. बालशिक्षणाच्या चळवळीचे ते प्रमुख कार्य आहे. यासाठी पंचवार्षिक नियोजन आणि त्यांतील उपक्रम यांची मांडणी करायला हवी.

हे पंचवार्षिक शिक्षण, शालेयपूर्व शिक्षण मानून त्याच्यासाठी सार्वत्रिक स्वरूपाची शैक्षणिक रचना, व्यवस्था आणि व्यापक राज्यीय-राष्ट्रीय धोरण यांची निर्मिती करायला हवी. यासाठी, शास्त्रीय मुद्यांच्या आधारावर आग्रह धरणे हे बालशिक्षणविषयक चळवळीचे एक दीर्घकालीन उद्दिष्ट मानता येईल. बालकांच्या आठ वर्षापर्यतच्या वयाचे विकासात्मक महत्त्व लक्षात घेतले तर या सा-या सूचनांची अपरिहार्यता सर्वाच्या लक्षात येईलच. परंतु बालशिक्षणाचे सामाजिक-राष्ट्रीय-वैश्विक महत्त्व लक्षात घेतल्याने, या सर्व सूचना प्रत्यक्षात आणण्याची निकडही अधोरेखित होईल.

**बालशिक्षणाचे सामाजिक महत्त्व**

अमेरिकेत मागास मुलांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करणारे अनेक उपकम तेथील सरकार राबवीत असते. मुख्य म्हणजे, अशा कार्यक्रमांचे वेळोवेळी, सरकारबाहय तज्ज्ञांकडून मूल्यमापनही केले जात असते.

अशाच एका उपक्रमाचे ('पेरी प्रिस्कूल इनिशिएटिव्ह') मूल्यमापन शिकागो विद्यापिठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक जेन्म्स हेकमन आणि त्यांचे मिशिगन विद्यापीठातील सहकारी डायमित्री मास्टेरोव्ह (Dimitry Masterov) यांनी केले. जेम्स हेकमन यांना २००० सालचे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक प्राप्त झाले आहे. हे पारितोषिक सुद्धा त्यांना मिळाले आहे, ते प्रामुख्याने त्यांच्या, निवडक नमुना पाहणीच्या संदर्भातील संख्याशास्त्रीय पध्दतींच्या विकासासाठी. ही घटना हेकमन यांचे संशोधन क्षेत्रातील उच्च स्थान दर्शविणारी आहे. या कारणानेही जेम्स हेकमन यांनी बालशिक्षणाच्या क्षेत्रातील केलेले संशोधन महत्त्वाचे मानले जात आहे...

हेकमन यांचे हे संशोधन वैशिष्टयपूर्ण आहे. १९६२ ते १९६७ या काळात, पेरी प्रकल्पांतर्गत मागास मुलांच्या सहा वर्षाच्या आतल्या शिक्षणावर खास भर देण्यात आला होता. दोन वर्षाचे हे शालापूर्व शिक्षण होते. या मुलांनी एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीस वयाच्या चाळीशीत पदार्पण केले होते आणि यांचाच अभ्यास हेकमन यांनी केला. या मुलांवर सरकारने तसेच कुटुंबांनीही, केलेला खर्च संशोधनात विचारात घेतला गेला होता. या मुलांच्या तुलनेत, समांतर कुटूंबातील, पण ज्यांना बालशिक्षणाचा लाभ मिळालेला नाही अशा मुलांचा अभ्यासही केला गेला; व काही भाकिते या आधारावर त्यांनी मांडली या संशोधनातून पुढे आलेल्या बाबी थोडक्यात अशा आहेत. ज्यांना शास्त्रशुध्द बालशिक्षणाचा लाभ मिळू शकत नाही अशा मुलांपैकी फक्त ४० टक्के मुले माध्यमिक शिक्षण पुरे करतात. फक्त ५ टक्के मुले कॉलेजप्रवेश करतात. आणि सामाजिकदृष्टया महत्त्वाची आकडेवारी अशी की, अशा मुलांपैकी ४० टक्के मुले गुन्हेगारीत शिरतात. याउलट, ज्यांच्या बालशिक्षणावर चांगले लक्ष केंद्रित केले गेले अशा मुलांपैकी ९० टक्के मुलांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. सुमारे ४० टक्के मुलांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले आणि फक्त १० टक्के मुले गुन्हेगारीकडे वळली आणि केवळ २ टक्के सरकारी मदतीवर जगताहेत.

हेकमन यांच्या दुस-या काही अभ्यासाचे निष्कर्षही महत्त्वाचे आहेत. उदाहरणार्थ, चांगल्या दर्जाच्या शास्त्रीय बालशिक्षणाचा लाभ मिळालेल्या मुलांच्या बाबतीत अधिक उत्पन्न मिळवण्याच्या शक्यता मोठया असतात. अशा मुलांची शाळांमधील प्रगती, त्यातही विशेषकरून गणित आणि वाचन यांमधील प्रगती चांगली होती. त्यांचे नापास होण्याचे प्रमाण कमी होते.

हेकमन यांच्याच आणखी एका अभ्यासात असे दिसून आले आहे की, शास्त्रीय बालशाळांचा लाभ मिळालेल्या मुलांची बौध्दिक आणि भाषिक कौशल्ये उच्च दर्जाची होती. आणखी एक अभ्यास असे दाखवून देतो की असे विविध लाभ हे उच्च उत्पन्न गटापेक्षाही अल्प उत्पन्न गटांच्या बाबतीत, अधिक प्रमाणात मिळतात. तसेच मुलांना वरच्या शैक्षणिक स्तरांवर स्कॉलरशिप्स देण्यापेक्षा, मुलांच्या बालशिक्षणावर गुंतवणूक करण्याचा व पुढे ती तशीच प्राथमिक शिक्षणात चालू ठेवण्याचा आग्रह, हेकमन धरतात. नोबेल पारितोषिक प्राप्त जेम्स हेकमन स्वतः असे म्हणतात की, “शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि गुन्हेगारी व सरकारी

अर्थसहाय्यावर जगणे कमी करण्यासाठी सर्वोत्तम गुंतवणूक कोणती असेल तर बालशिक्षणावरची गुंतवणूक होय.!"

बालशिक्षणाचे सामाजिक फायदे किती मोठया प्रमाणावर मिळतात, याची कल्पना, आणखी एक शोधअभ्यासावरून मिळते. अमेरिकेतील शिकागो राज्यात, सरकारी मदतीवर चालणारी 'बालक-पालक केंद्रे आहेत. १९६७ सालापासून आजवर सुमारे लाखभर मुलांना या केंद्रांमधील बालशिक्षणाचा लाभ मिळाला आहे. तीन-चार वर्षाच्या या मुलांपैकी ९८९ मुलांचा पुढील चौदा वर्षे, म्हणजे अठराव्या वयापर्यंत त्यांच्या प्रगतीचा शोध घेण्यात आला. या मुलांच्याबरोबरच, जी मुले या बालशिक्षण कार्यक्रमात नव्हती अशा ५५० मुलांचाही असाच शोध घेतला गेला. या अभ्यासाचे निष्कर्ष असे होते की, जी मुले या कार्यक्रमाबाहेर होती त्यांच्याबाबतीत, अठराव्या वयापर्यत वेगवेगळया गुन्हयांसाठी अटक होण्याचे प्रमाण कार्यक्रमांतील मुलांच्या तुलनेत, ७० टक्क्यांपेक्षाही जास्त होते. अल्प उत्पन्न गटातील ज्या मुलांना, या प्रकारच्या बालशिक्षणातील प्रेममय वातावरणाचा लाभ मिळाला नव्हता, त्यांच्याबाबतींत, वयाच्या सत्ताविसाव्या वर्षापर्यत गुन्हेगारीत अडकण्याची शक्यता पाच पटीने अधिक आढळल्या.

अशा प्रकारचे अनेक अभ्यास होऊ लागले आहेत. येथे वानगीदाखल केवळ दोनच अभ्यासांचा उल्लेख केला आहे. परंतु त्यांतून निघणारे सामान्य निष्कर्ष स्पष्ट आहेत.

१. व्यक्तिगत पातळीवरही, बालशिक्षणामुळे, अधिक चांगले कुटुंबसंस्कार होऊन, आर्थिक संपन्नतेच्याही संधी अधिक प्रमाणात प्राप्त होतात.

२. बालशिक्षण जेवढे शास्त्रीय आणि दर्जेदार घडून येईल तेवढा प्राथमिक-माध्यमिक ___ शिक्षणाचा दर्जा सुधारून, त्याचेही वैयक्तिक व सामाजिक लाभ मिळतात.

३. बालशिक्षण हे केवळ बालकांच्या शिक्षणाकरिताच नव्हे तर त्यांच्या सामाजिक संस्कारांच्या
दृष्टीनेही अतिशय महत्त्वाचे आहे.

४. देशाच्या, भावी काळातील गुन्हेगारीला आळा घालण्याचा एक प्रभावी मार्ग म्हणजे सर्वच ___मुलांना दर्जेदार बालशिक्षणाची संधी प्राप्त करून देणे.

५. गुन्हेगार बनल्यानंतर, त्यांच्यावर कायदेशीर खटले चालवून त्यांना तुरूंगात टाकण्याच्या व तुरूंगात सांभाळण्याच्या सामाजिक खर्चाचे प्रमाण मोठे असते. बालशिक्षणावर तुलनेने फारच कमी खर्च करावा लागतो आणि या छोटयाशा खर्चात, भविष्यातील मोठा खर्च टाळण्याचे सामर्थ्य असते. म्हणजेच, निव्वळ सामाजिकदृष्टयाच नव्हे तर आर्थिकदृष्टयाही बालशिक्षण समाजाला लाभदायक ठरते.

बालशिक्षणाचे सर्वच व्यक्तिगत व सामाजिक लाभ मिळण्यासाठी, बालशिक्षण सार्वत्रिकरित्या सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हाते; ते मुळातच शास्त्रीय आणि दर्जेदार असावे आणि त्यावर शासनाची नव्हे तर समाजाची हुकमत असावी; हा विचार समोर ठेवून, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या कार्यकर्त्यांनी, अखंडपणे झटले पाहिजे. आपल्या भोवतालच्या छोटयाशा प्रदेशातही या दिशेने जाणीव-जागृतीचे काम आपल्यापैकी प्रत्येकाने करायला हवे.

सामान्यत: राजकीय चळवळी चमकून उठतात आणि म्हणून उठून दिसतात. प्रबोधनाच्या चळवळींना हे वलय नसते. या चळवळींना शक्ती ही त्यांच्या विस्तारात आणि निश्चित भूमिकेच्या पायावर केलेल्या दर्जेदार कार्यामध्ये असते. त्यासाठी शांतपणे एक एक पाऊल पुढे टाकत, अधिक संख्येच्या लोकांना जवळ करीत आणि त्यांच्या मनांत समाजकल्याणकारी कार्याची ज्योत पेटवीत जायचे असते. आपण सर्वच या शांत-शैक्षणिक चळवळीच्या फौजेतील शिपाई आहोत.

तुम्हा सर्वाना या कार्याची उदंड प्रेरणा आणि शक्ती प्राप्त होवो अशी सदीच्छा व्यक्त करून मी माझे हे, जरासे लांबलेले भाषण संपवतो.

(औरंगाबाद येथे दि.२३-२४-२५ ऑक्टोबर २००९ या दिवशी होत असलेल्या 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील भाषण.)

❖